मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्र. ८९२८/२०१५ व इतर याचिका यामध्ये दि. ६ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासंदर्भात गठित मंत्रिमंडळ उपसमितीस मुदतवाढ.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक: बीसीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : ०८ जुलै, २०१९

वाचा-१) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.७२/१६-ब,दि.५ जुन,२०१८

२) शासन निर्णय क्रमांक: बीसीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दि.२३ जानेवारी,२०१९

प्रस्तावना-

मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्र.८९२८/२०१५ (चेअरमन ॲन्ड मॅनेजिंग डायरेक्टर, एफसीआय आणि इतर विरूद्ध जगदिश बालाराम बहिरा व इतर) व इतर याचिका यामध्ये दि.६ जुलै,२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाची राज्यात अंमलबजावणी कशाप्रकारे व्हावी याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्यासाठी व शासनास शिफारस करण्यासाठी संदर्भ क्र.१ येथिल शासन निर्णयान्वये मा.मंत्री, आदिवासी विकास यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीच्या स्थापनेस मा.उच्च न्यायालय,खंडपीठ नागपूर यांनी रिट पिटिशन क्र.३१४०/२०१८ मध्ये दि.११.६.२०१८ रोजी अंतरिम आदेशान्वये स्थगिती दिल्याने मंत्रिमंडळ उपसमितीस विहित मुदतीत शासनास शिफारशी सादर करणे शक्य झाले नाही. मा.उच्च न्यायालयाने दि.२८.९.२०१८ रोजी समितीवरील स्थगिती उठविल्यानंतर संदर्भ क्र.२ येथिल शासन निर्णयान्वये शासनास शिफारशी सादर करण्यासाठी सदर समितीस दि.३१ मार्च,२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. तथापि, त्यानंतर दि.१० मार्च, २०१९ ते दि.२३ मे, २०१९ या कालावधीत राज्यात लोकसभेच्या निवडणूकीची आदर्श आचारसंहिता अंमलात आणल्याने सदर समितीस आपले कामकाज करता आले नाही. त्यामुळे सदर समितीस आणखी मुदतवाढ देण्याची बाब शासनच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय-

मा.मंत्री, आदिवासी विकास यांच्या अध्यक्षतेखाली संदर्भाधिन क्र.१ येथिल शासन निर्णयान्वये गठित करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीस शिफारशी सादर करण्यासाठी दि. ३१ डिसेंबर, २०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०७०८१४४३४१७४०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rasik Ambadas Khadse

Digitally signed by Rasik Ambadas Khadse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fdc00fa9bc45e4f7281973d193127b8989dfa5df6a7a694b005e562ebd5c840e, serialNumber=a47200a14b42f151489f73f3e47c9e8733991629b2302a3831b945146be88a80, cn=Rasik Ambadas Khadse
Date: 2019.07.08 14:50:09 +05'30'

(र.अं.खडसे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१)राज्यपाल यांचे सचिव, २)मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, ३)सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, ४)मा. विरोधी पक्षनेता,विधानपरिषद ५)मा. विरोधी पक्षनेता,विधानसभा ६)सर्व विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य ७)मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य. ८)अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, ९)प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानसभा) १०)प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानपरिषद) ११)सर्व विभागीय आयुक्त, १२)सर्व जिल्हाधिकारी, १३)सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, १४)प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई, १५)प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई, १६)प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई, १७)प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई,नागपूर,औरंगाबाद, १८)सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई, १९)सचिव,राज्य निवडणूक आयोग, २०)सचिव,राज्य माहिती आयोग, २१)महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,	२२)राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक, २३)सर्व महानगरपालिकांचे आयुक्त, २४)सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका, २५)संचालक, समाजकल्याण, पुणे, २६)आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक, २७)संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, २८)संचालक, सेवायोजन, मुंबई, २९)महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर, ३०)महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर, ३१)अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई, ३२)निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई, ३३)सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख, ३४)ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई ३५)सर्व मान्यता प्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये,महाराष्ट्र राज्य, ३६)निवड नस्ती, कार्यासन १६-ब.